
# नेक नामदार गोखले


V2wM66
P3
26163

गोविंद तळवलकर



नेक-नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या संबंधी आजवर अनेक विचारवंतांनी आणि जाणकारांनी विविध प्रकारे विपुल लेखन केले आहे. ते ग्रंथबद्धही झालेले आहे. परंतु जसजशी नवी माहिती आणि कागदपत्रे नव्याने उपलब्ध झाली, तसतसे त्यांच्या व्यक्तित्वाचे आणि कर्तृत्वाचे नवे पैलू अभ्यासकांच्या दृष्टीस आले.

नामवंत संपादक, लेखक व विचारवंत श्री.गोविंद तळवलकर हे एक व्यासंगी आणि चिकित्सक वाचक आहेत. ग्रंथ हेच आपले मित्र आणि गुरू असे मानणाऱ्यांपैकी ते एक आहेत. सामाजिक, राजकीय, आर्थिक विषयांबद्दल त्यांना अधिक आपुलकी असली तरी चांगले ललित साहित्य व काव्य यांचीही त्यांना आवड आहे. वाचन प्रचंड असले तरी त्यात एक शिस्तबद्धता व सातत्य असल्याचे दिसून येते.

गोखले चरित्रग्रंथाचे नव्याने लेखन करताना त्यांनी अनेक देशी विदेशी ग्रंथांचे परिशीलन केल्याचे आढळून येईल. त्याचप्रमाणे भारत-इंग्लंडमधील तत्कालीन परिस्थिती, घटना व त्यांचे परिणाम, त्या काळातील प्रमुख व्यक्ती, नेते व राज्यकर्ते यांचे परस्परसंबंध व स्वभावविशेष, यांचेही डोळस निर्देश या ग्रंथात अनेक ठिकाणी दिसून येतील. आजवर अज्ञात असलेली बरीच माहिती वाचकांच्या ज्ञानात नव्याने भर घालेल.

लेखकाने परिश्रमपूर्वक लिहिलेला हा चरित्रग्रंथ वाचकांना आवडून ते त्याचे स्वागत करतील.

# श्री. गोविंद तळवलकर

यांची ग्रंथसंपदा

• • •

टिळक दर्शन

बाळ गंगाधर टिळक

नवरोजी ते नेहरू

वाचता वाचता, २ खंड

सत्तांतर:१९४७, ३ खंड

परिक्रमा

नियतीशी करार

विराट ज्ञानी:न्यायमूर्ती रानडे

अभिजात

बदलता युरोप

प्रासंगिक

ग्रंथसंगती, २ खंड

पुष्पांजली, २ खंड

अक्षय

बहर

लाल गुलाग

व्यक्ती आणि वाङ्मय

सोव्हिएत साम्राज्याचा उदय आणि अस्त, ४ खंड

अग्निकांड

नेक नामदार गोखले

NEK NAMDAR GOKHALE
**नेक-नामदार गोखले**
• • • • •
© गोविंद तळवलकर
• • • • •
**प्रकाशक**
सर्जेराव घोरपडे
प्रेस्टीज प्रकाशन
४६१/१, सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ३०.
• • • • •
**मुद्रक**
चंद्रसेन घोरपडे
प्रिंटेक्स्ट ऑफसेट
४६१/१, सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ३०.
• • • • •
**मुखपृष्ठ**
सचिन जोशी
• • • • •
**अक्षरजुळणी**
अक्षरधारा टाइपसेटर्स
• • • • •
**मुद्रितशोधन**
शरद महाबळ
• • • • •
**प्रथमावृत्ती**
मार्च २००३
• • • • •
**वितरण**
मौज प्रकाशन
खटाववाडी, गिरगांव,
मुंबई ४
• • • • •
**किंमत**
५०० रुपये

# नेक नामदार गोखले

गोविंद तळवलकर

# अनुक्रम


आभार / ७

प्रास्ताविक / ९

१. आरंभकाळ / १४

२. ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य / ४८

३. काँग्रेसची स्थापना / १०७

४. नवे वळण - एक दशक / १७७

५. अग्निदिव्य / २४६

६. साम्राज्य व आर्थिक व्यवहार / ३०१

७. कळस / ३४१

८. फाळणी - बंगालची व काँग्रेसची / ३९७

९. मोर्ले मिंटो सुधारणा / ४६९

१०. दूरगामी बदल / ५२२

११. अखेरचे पर्व / ५५३

नेक-नामदार गोखले यांचे शिष्य व राजकीय वारस
कै. श्रीनिवास शास्त्री यांच्या स्मृतीस

**– गोविंद तळवलकर**



# आभार

माझे चुलते कै. गोपीनाथ तळवलकर यांनी १९४७ मध्ये श्रीनिवास शास्त्री यांचे 'माय मास्टर गोखले' हे पुस्तक वाचण्याची शिफारस केली व त्याप्रमाणे मी ते वाचले. गोखले यांचे व्यक्तित्व व कर्तृत्व यांविषयी शास्त्री यांनी दिलेल्या रसाळ भाषणांचा हा संग्रह मी नंतर अनेकदा निरनिराळ्या निमित्ताने वाचला.

शास्त्री यांचे पुस्तक वाचल्यानंतर साधारणत: त्याच सुमारास बोरीबंदर स्टेशनाच्या जवळ रस्त्यावर पुस्तके विकणाऱ्याकडे मला गोखले यांच्या समग्र भाषणांचा नटेशन कंपनीने प्रसिद्ध केलेला ग्रंथ मिळाला. तोही नंतर अनेकदा वाचला. पुढील काळात गोखले यांच्यासंबंधीचे इंग्रजी व मराठीतील बरेच ग्रंथ वाचले.

हे सर्व वाचत असताना गोखले यांचे चरित्र लिहिण्याचा विचार मनात आला. तो मी माझे प्रकाशक मित्र श्री. सर्जेराव घोरपडे यांना सांगितला. या ना त्या कारणाने गोखले चरित्राचे लिखाण लांबणीवर पडत गेले. आता ते पुरे होऊन वाचकांच्या हाती देत आहे.

गोखले यांच्यासंबंधीच्या या पुस्तकाच्या नावाचाही खुलासा केला पाहिजे. 'नेक नामदार गोखले' असे नाव दिले आहे. त्या काळात केंद्रीय कायदेमंडळाच्या सभासदांना 'राइट ऑनरेबल' असे म्हटले जात असे. त्याचे भाषांतर नेक नामदार असे तेव्हा केले जात होते. गोखले यांना ही उपाधी अनेक अर्थाने शोभत होती. गोखले हे नेकीने वागणारे होते. ही नेकी त्यांनी केवळ व्यक्तिगत जीवनातच पाळली नाही, तर सार्वजनिक जीवनातही पाळली. सार्वजनिक जीवनाचे वा राजकीय जीवनाचे अध्यात्मीकरण करण्याचा आग्रह त्यांनी धरला होता आणि त्याप्रमाणे त्यांचे वर्तन होत असे. नामदार या नात्याने त्यांनी लोकांचे प्रतिनिधित्व केले. या रीतीने नेक नामदार ही उपाधी गोखले यांना शोभत होती.

गोखले यांच्यासंबंधी अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. केवळ गोखले यांच्यासंबंधी न लिहिता त्यांच्या काळाचाही आढावा घ्यावा असे मी ठरवले. काळाच्या संदर्भात गोखले चरित्राचा विचार करायचा तर महाराष्ट्र, भारत व इंग्लंडमधील त्या वेळच्या घडामोडींचा संदर्भ व प्रमुख व्यक्तींचे कार्य यांचीही दखल घेणे आवश्यक वाटले. यासाठी ज्याप्रमाणे अनेक ग्रंथांचा उपयोग झाला त्याचप्रमाणे वृत्तपत्रे व नियतकालिके यांचाही झाला. विशेषत: 'एडिंबरा रिव्ह्यू,' 'फॉर्टनाइटली रिव्ह्यू' अशा नियतकालिकांतून त्यावेळी कोणते विषय चर्चिले जात होते याची कल्पना आली.

ही व इतर नियतकालिके व वृत्तपत्रे ह्यूस्टनमध्ये मिळू शकली.

त्या वेळी इंग्लंडची भारतावर साम्राज्यसत्ता होती आणि ब्रिटिश पार्लमेंट व वृत्तपत्रे आणि नियतकालिके इथल्या राजकीय व आर्थिक प्रश्नांची बरीच सविस्तर चर्चा करत असत. आपल्या राजकीय प्रवासाचा आढावा घेताना या चर्चेची दखल घेणे अगत्याचे आहे.

हे पुस्तक मी इथे अमेरिकेत लिहिले. त्यासाठी आवश्यक ती मराठी पुस्तके कशी मिळवायची हा प्रश्न होता. परंतु अमेरिकन लायब्ररी ऑफ काँग्रेस तसेच अमेरिकेतील विविध ग्रंथालयांकडून ग्रंथ मिळण्यासाठी जी खास आंतर ग्रंथालय सेवा उपलब्ध आहे तिचा फार उपयोग झाला. तसेच ह्यूस्टन इथल्या सार्वजनिक ग्रंथालयाचा आणि राइस या विद्यापीठाच्या ग्रंथालयाचा भरपूर उपयोग करून घेता आला. यामुळे जुनी ब्रिटिश वृत्तपत्रे, साप्ताहिके व नियतकालिके मिळू शकली.

ग्रंथांचा शोध आणि नंतर त्यांची सूची हे जिकिरीचे काम आहे. तसेच लिखाण तयार झाल्यानंतर इंटरनेटने ते धाडण्याचे कामही महत्त्वाचे आहे. या दोन्ही कामांची जबाबदारी माझ्या दोन कन्या डॉ. निरुपमा व सुषमा यांनी उचलली व मला हा भार उचलावा लागला नाही. 'मौज' प्रकाशनाचे प्रकाशक श्री. संजय भागवत यांचीही मदत झाल्याचे साभार नमूद केले पाहिजे.

गोखले यांचे दफ्तर महत्त्वाचे आहे तसेच दादाभाई नवरोजी यांचे. गोखले दफ्तर मिळवून देण्यासाठी सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीचे डॉ. काकडे व गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या ग्रंथालयाच्या ग्रंथपाल सौ. आशा गद्रे यांनी मदत केली, तर दादाभाईंचे दफ्तरासाठी दादाभाई नवरोजी विश्‍वस्त निधीचे एक विश्‍वस्त आणि माझे मित्र श्री. एम्. आर्. पै यांनी साहाय्य केले. या विश्वस्त निधीने दादाभाईंचे दफ्तर उपलब्ध करून देण्याचा ठराव केला. या सर्वांचे आभार.

गोखले चरित्राचे लिखाण करताना काही व्यक्तींविषयीची माहिती कै. जयंतराव टिळक यांनी दिली. त्यांनी व 'केसरी'चे माजी संपादक श्री. अरविंद गोखले यांनी काही पुस्तकेही पाठवली. गोखले चरित्राचे प्रकाशन झाल्याचे पाहण्यास जयंतराव हयात नाहीत हे खेदजनक आहे. त्यांचे व अरविंद गोखले यांचे साहाय्य झाले हे साभार नमूद करत आहे.

श्री. सर्जेराव घोरपडे व त्यांचे चिरंजीव चंद्रसेन यांनी पुस्तक आकर्षक रीतीने प्रकाशित केले आहे. त्यांचे आभार मानणे औपचारिक होईल.

**— गोविंद तळवलकर**

gtalwalkar@hotmail.com

# प्रास्ताविक

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म १८६६ मधला आणि त्यांचे निधन झाले १९१५ मध्ये. या अवधीत आणि नंतर गोखले यांच्यासंबंधी बरेच लिखाण मराठी आणि इंग्रजीत झाले आणि अनेक ग्रंथही प्रसिद्ध झाले आहेत. असे असताना गोखले यांच्यासंबंधी आणखी एका नव्या ग्रंथाचे प्रयोजन काय? असा प्रश्न विचारला जाण्याची शक्यता आहे. याचे एक उत्तर आलंकारिक भाषेत देता येईल. असे म्हणतात की, आपल्या फांद्यांवर लहान पक्षी गात असले तरी रानावनातील मोठ्या वृक्षांना आनंद होतो. गोखले आणि त्यांचा काळ यासंबंधीचे हे पुस्तक हे एका लहान पक्ष्याचे गायन या दृष्टीने मी विचार केला. या चरित्रलेखनाचे आणखी एक कारण देता येईल. ते असे की, गोखले यांच्यासारख्या आदर्श देशसेवकाच्या आणि त्याच्यासंबंधीच्या लिखाणाच्या वाचनामुळे आपण त्याच्या सहवासात मनाने जातो. हा सहवास अनेक दृष्टीने उत्साहवर्धक असतो. या उत्साहात वाचकांना सहभागी करून घ्यावे हाही हेतू आहे. वर वृक्षावरील गाणाऱ्या पक्ष्याचा दाखला दिला असला तरी गोखले यांच्यासंबंधातील भक्तिमार्गप्रदीप असे या पुस्तकाचे स्वरूप नाही.

बहुतेक मोठ्या व्यक्तींच्या बाबतीत असे दिसते की, त्यांनी आपले जीवितकार्य अगदी तरुणपणीच निश्चित केलेले असते. गोखले यांनी आपल्याला काय साध्य करायचे आहे हे याप्रमाणे ठरवले होते. त्यांनी स्वत:पाशी अशी नोंद केली होती की, 'दत्तात्रेयांच्या कृपेने मी विनयशीलतेने पण खंबीरपणे पुढील गोष्टी साध्य करीन : नियमितपणे योगसाधना, प्राचीन व आधुनिक इतिहास, प्राचीन व आधुनिक तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र, भूगर्भशास्त्र. शरीरशास्त्र, मानसशास्त्र आणि फ्रेंच भाषा यांचे चांगले ज्ञान संपादन करीन. तसेच मुंबई विधिमंडळ, केंद्रीय विधिमंडळ (इंपिरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल) आणि ब्रिटिश पार्लमेंट यांचा सभासद होण्याचा प्रयत्न करीन. या तिन्ही मंडळांत माझ्या देशाच्या हितासाठी जे काही माझ्या कुवतीप्रमाणे करता येईल ते करीन. सर्वोच्च धार्मिक तत्त्वांचा प्रचार जगभर करण्याचा प्रयत्न करीन.'

यांपैकी बरेच संकल्प गोखले यांनी साध्य केले. ब्रिटिश पार्लमेंटची निवडणूक लढवून दादाभाई नवरोजी त्याचे सभासद झाले होते आणि गोखले यांना अधिक आयुष्य मिळाले असते तर कदाचित तेही ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद झाले असते.

गोखले यांच्यापेक्षा लोकमान्य टिळक आणि आगरकर हे वयाने मोठे. त्या दोघांनीही

तरुणपणीच अनेक संकल्प सोडले होते. आगरकरांच्या निधनानंतर लोकमान्यांनी लिहिलेल्या अग्रलेखात म्हटले होते : "गेल्या पाचदहा वर्षांत यांच्या व आमच्या दरम्यान असलेला मतभेद बराच लोकांपुढे आला आहे, पण मृत्यूचें स्वरूप इतकें उग्र आणि भयंकर आहे कीं, त्यामुळें बारीकसारीक गोष्टी विसरून जाऊन प्रथमत: दृढनिश्चयानें त्यांनीं व आम्ही कांहीं विशिष्ट लोकोपयोगी कार्यें करण्याचें मनांत आणलें व त्यानंतर तीं कार्यें सिद्धीस नेण्याकरितां एकदिलानें घरीं, दारीं किंबहुना कारागृहीं जे बेत व उद्योग केले त्यांचें तीव्र स्मरण पुन:पुन्हा होऊन आमची बुद्धि आणि लेखणी गोंधळून जाते."

घरी, दारी आणि कारागृही लोकमान्य आणि आगरकर यांनी लोकोपयोगी कार्ये सिद्धीस नेण्याचे बेत केले होते. यांतील कारागृहात असताना कोणते बेत केले व त्यांची बोलणी होत याची कल्पना आगरकरांच्या 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस' या पुस्तकावरून येऊ शकते. तेथे आगरकर लिहितात, "मी 'एम. ए.'करितां व टिळक 'एल. एल. बी.'करितां अभ्यास करण्यासाठी कालेजांत राहिलो असतां सरकारी नौकरी न पत्करितां देशसेवेंत आयुष्य घालवण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला त्या दिवसापासून आम्हीं जें जें बोललों चाललों होतों त्याची पुन:पुन्हा आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे—आपले मूळचे हेतु कोणते, व ते कितपत सिद्धीस गेले आहेत;—आम्ही आरंभिलेलीं कामें आमच्या हयातींत, व आमच्या पाठीमागें कित्येक वर्षें अप्रतिहत चाललीं तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल; या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्याचें कोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे; लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्तानची भावी स्थिति काय होईल; नेटिव संस्थानांची सुधारणा होण्यासाठी काय करावें, देशभाषा युनिव्हर्सिटीत आणण्यासाठीं कोणती युक्ति काढावी; —फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा कोणत्या; वगैरे नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ एवढ्या जोरानें वाद चाले कीं, आसपासचे शिपाई 'हळू बोला, हळू बोला,' अशा इशारा करीत व बोलतां बोलतां रात्र निघून जाई."[१] असे हे नेते होते आणि त्यांना तरुणपणीच आपले जीवनध्येय सापडले होते. ते सापडल्यानंतर टिळक, आगरकर व गोखले हे त्यांच्या ध्येयापासून विचलित झाले नाहीत आणि त्यांनी आयुष्य देशसेवेला वाहिले.

केवळ लौकिक अर्थाने पाहिले तरी गोखले यांनी त्यांच्या अल्पवयात फार मोठे यश मिळवले होते. अठराव्या वर्षी गोखले पदवीधर झाले. त्यानंतर विसाव्या वर्षी फर्ग्युसन महाविद्यालयात प्राध्यापक, एकविसाव्या वर्षी सार्वजनिक सभेचे चिटणीस आणि त्याच वर्षी 'सुधारक' या पत्राच्या इंग्रजी विभागाचे संपादक, पंचविसाव्या वर्षी प्रांतिक परिषदेचे तर एकोणतिसाव्या वर्षी राष्ट्रीय सभेचे चिटणीस, वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगापुढे महत्त्वाची साक्ष ३१ च्या वर्षी आणि ३४ व्या वर्षी प्रांतिक तर ३६ व्या वर्षी केंद्रीय वा ज्यास इंपिरियल विधिमंडळ म्हटले जाई त्यांत, ३९ व्या वर्षी काँग्रेसचे अध्यक्ष आणि ४० व्या वर्षी भारत सेवक समाजाची स्थापना. ज्या ज्या क्षेत्रात गोखले यांनी प्रवेश केला तिथे त्यांची कामगिरी नावाजण्यासारखी झाली आणि भारताच्या राजकारणावर प्रभाव पाडत असताना त्यांनी त्यास वळणही लावले.

टिळक, आगरकर आणि गोखले या तीन धन्य पुरुषांतील एक म्हणजे गोखले. त्यांच्या जीवितकार्याची माहिती करून घेताना महाराष्ट्रात त्या काळात झालेले वाद लक्षात घ्यावे लागतील, पण केवळ त्यांवरच सर्व भर देण्याचा माझा इरादा नाही. या वादांचा आज विचार करताना असाही प्रश्न पडतो की, टिळकांचे आगरकर व गोखले यांच्याशी वाद झाले तेव्हा तिघांच्याही वयाची दखल घ्यायला पाहिजे तितकी घेतली गेली काय? पंचवीस, तीस वा चाळीस वर्षांच्या वयात हे वाद झाले ते तसे व तितक्या कडवटपणे यापेक्षा वाढत्या वयात लढवले गेले असते काय? यामुळे त्या वादांचा विचार करताना टिळक, आगरकर आणि गोखले यांच्या वयाची दखल अगदीच न घेऊन चालणार नाही. (टिळक व गोखले यांच्यांतील अखेरचा वाद झाला तेव्हा टिळकांनी पन्नाशी ओलांडली होती.) महाराष्ट्रातील आणि देशातील ज्या एकंदर परिस्थितीत हे वाद झाले तिचीही जाणीव ठेवली पाहिजे. यामुळे तेव्हाच्या परिस्थितीची दखल मी घेणार आहे.

भारतात त्या वेळी जी राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती होती तिचा इंग्लंड आणि युरोपमधील परिस्थितीशी निकटचा संबंध होता. तिच्यासंबंधात आता बरीच माहिती आणि साधनसामग्री उपलब्ध झाली असून तिचा शक्य आणि आवश्यक तेवढा उपयोग करण्याचा विचार आहे. तो करताना एक गोष्ट लक्षात येते की, कोणत्याही काळात सर्व देशांमधील सर्व समाजनियंते एकाच विचाराने भारलेले नसतात. सर्व समाजही एकाच विचाराने उद्युक्त झालेला नसतो. मते विविध असतात आणि भिन्नभिन्न भूमिका घेतलेल्या असतात. त्यामुळे कोणत्याही समाजासंबंधी एकच सर्वसाधारण निकष लावता येत नाही आणि त्या समाजासंबंधी एकच निष्कर्षही काढता येत नाही. राज्यकर्त्यांत भिन्न विचारांचे व प्रवृत्तीचे लोक असतात तसे ज्यांच्यावर राज्य केले जाते त्यांच्यांतही असतात. प्रत्येक व्यक्तीची काही मानसिक ठेवण असते. तिच्यानुसार तिचे वर्तन होत असते. या मानसिक ठेवणीमुळे प्रत्येकाच्या काही मर्यादा असतात. या विविध घटकांचा परिणाम समाजात घडणाऱ्या घटनांवर होत असतो. तसेच विशिष्ट काळात विशिष्ट राजकीय, आर्थिक व सामाजिक व्यवस्था अस्तित्वात असते तिचाही परिणाम होत असतो. आज जे विचार व आचार आपल्याला साहजिक व अपरिहार्य वाटतात तसे ते पूर्वीच्या काळात वाटण्याची अपेक्षा बाळगून चालणार नाही. ही व्यापक पार्श्वभूमी आणि दृष्टिकोण घेऊन गोखले यांच्या जीवनाची आणि त्यांच्या जीवनकार्याची माहिती करून घेण्याचा प्रयत्न मी करणार आहे. यामुळे गोखले आणि त्यांचा काळ असे या पुस्तकाचे स्वरूप राहील.

कोणत्याही समाजात भिन्न वृत्तीचे लोक असतात व राज्यकर्त्यांच्या बाबतीतही असेच दृश्य दिसते. त्यामुळे कोणत्याही समाजाबद्दल एकच एक असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येत नाही असे वर म्हटले आहे. लॉर्ड मोर्ले यांचे यासंबंधात वेगळे मत दिसते. त्यांच्या मते प्रत्येक समाजाचे सामूहिक वर्तन काही बाबतीत विशिष्ट स्वरूपाचे होणार असा अंदाज बांधता येतो. या स्थितीत ज्या ब्रिटिशांनी आपल्यावर दीर्घ काळ राज्य केले त्यांची राजकीय, आर्थिक व सामाजिक बाबतीत वर्तनपद्धती कशी असते याची ओळख करून घेण्यास लॉर्ड मोर्ले यांनी केलेली मीमांसा उपयुक्त ठरेल. मोर्ले यांना लॉर्ड हा किताब मिळालेला नव्हता आणि ते मंत्रीही

झाले नव्हते तेव्हा ते 'फॉर्टनाइटली रिव्ह्यू' या मासिकाचे संपादक होते. (प्रथम ते पाक्षिक होते व त्याचे मासिकात रूपांतर झाले तरीही 'फॉर्टनाइटली रिव्ह्यू' हे नाव बदलले नव्हते.) संपादक या नात्याने त्यांनी या मासिकात १८६८ साली झालेल्या ब्रिटिश लोकसभेच्या (हाऊस ऑफ कॉमन्स) निवडणुकीसंबंधात मतप्रदर्शन केले होते. त्या वेळी मताधिकार वाढला होता. तसा तो वाढवण्यास काही परंपरावाद्यांनी विरोध केला होता. परंतु निवडणूक झाल्यानंतर ब्रिटिश लोकसभेत काही क्रांतिकारक विचारांच्या सभासदांची वाढ झाली नाही. तिचे स्वरूप साधारणत: स्थितिवादीच राहिले. याचे स्पष्टीकरण करताना मोर्ले यांनी १८६८ सालच्या डिसेंबरच्या 'फॉर्टनाइटली रिव्ह्यू'मध्ये लिहिले की, 'आपल्या (ब्रिटिश) समाजाच्या पूर्वेतिहासाचा एकंदर बाज आणि विद्यमान समाजाचे राष्ट्रीय चारित्र्य पाहिले तर या समाजाच्या काही वैशिष्ट्यांचा उलगडा होतो. एखाद्या विशिष्ट बाबतीत स्थिर राहण्यात आपण कमी पडत नाही, मात्र उत्साहात पडतो. आपण चटकन उद्दीपित होत असल्यामुळे आपण दुर्बल होतो अशातली गोष्ट नाही. उलट आपण बौद्धिक मांद्य प्रगट करीत असतो व त्यामुळे दुर्बलता येते. आत्मनियंत्रणात आपण कमी पडत नाही तर आपल्यात चैतन्य, उत्साह यांची कमतरता आहे. त्यामुळे राजकीय आचारात कार्यक्षमता मर्यादित आहे. पूर्वीच्या काळात व आजही कोणताही लहानसा बदल वा सुधारणा करायची तर इतके श्रम खर्ची पडतात व इतका कालावधी लागतो की, इतर समाजात तेवढ्या जोरावर क्रांती झाली असती.' ब्रिटिश राजवटीत भारतात आर्थिक व राजकीय बाबतीत अतिशय मंद पावले टाकली जातात अशी भारतीयांची रास्त तक्रार होती. पण मोर्ले यांनी म्हटल्याप्रमाणे ब्रिटनमध्येही संथ गतीनेच सुधारणा होत आल्या होत्या. त्या समाजाच्या मानसिक ठेवणीचा हा परिणाम म्हणता येईल.

मानवी जीवन तसेच समाजाचे जीवन एका सरळ रेषेत कधीच व्यतीत होत नाही. त्यास अनेक वळणे असतात. या वळणांची दखल घेणे आवश्यक असते. तशी ती घेण्याचा प्रयत्नही इथे मी केला आहे. तो कितपत साध्य झाला हे मी सांगू शकणार नाही. तसेच सामाजिक परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेणेही आवश्यक असते. कारण माणूस हा जसा परिस्थितीच्या प्रभावाखाली असतो त्याचप्रमाणे तो ती परिस्थिती बदलण्याचेही प्रयत्न करत असतो. भारतात व ब्रिटनमध्ये एकोणिसाव्या शतकात व विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत कोणती परिस्थिती होती आणि तिचे त्या काळातल्या राष्ट्रनेत्यांच्या आचारविचारांवर कोणते परिणाम झाले, हेही पाहिले पाहिजे. इथे जे ब्रिटिश राज्यकर्ते आले होते त्यांच्यावर तत्कालीन इंग्लंडमधील व युरोपमधील काही विचारांचा पगडा होता; तर आपल्या पहिल्या पिढीचे पुढारी काही संस्कारांत वाढले होते. याचीही आवश्यक ती दखल घेतली पाहिजे.

हिंदुस्थानसारखा खंडप्राय देश ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली आला तो सर्व डावपेच व धोरण आधी आखून नव्हे. या देशातील लोकांची संस्कृती, त्यांचा धर्म, इतिहास ही सर्व युरोप व इंग्लंड यांच्यापेक्षा वेगळी होती. आपला इतक्या परकी लोकांशी रोजचा व्यवहार करण्याचा संबंध कित्येक शतके आला नव्हता त्याचप्रमाणे ब्रिटिशांचाही त्यांच्यापेक्षा संस्कृती, धर्म, इतिहास या सर्वच बाबतींत पूर्णत: भिन्न अशा लोकांशी संबंध आला नव्हता. राजकारण, अर्थकारण व समाजकारण या सर्वच बाबतींत हिंदुस्थानात ज्या घडामोडी एकोणिसाव्या

शतकात व विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात घडल्या त्यांचे विश्लेषण करताना हाही घटक ध्यानात घेणे जरूर आहे. या सर्व घडामोडी आपण काळाच्या संदर्भात तपासणार आहोत आणि त्याचबरोबर गेल्या कित्येक वर्षांत उपलब्ध झालेल्या माहितीची दखल घेऊन त्यांचे विश्लेषण करणार आहोत. त्यामुळे अनेक वर्षे जपलेले काही विचार व सिद्धान्त बदलण्याचीही मानसिक तयारी ठेवली पाहिजे. एके काळी जे विचार व सिद्धान्त निरपवाद स्वीकारले जात होते ते आता तसेच स्वीकारले पाहिजेत असे नाही.

हे पुस्तक लिहिण्यासाठी अनेक ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे आणि कागदपत्रे पाहताना विशेष बौद्धिक आनंदाचा लाभ झाला. त्यात वाचकांना सहभागी करण्याच्या इच्छेपोटी हे लिखाण केले. त्यात कितपत यश आले हे वाचकच ठरवणार!

□□

**संदर्भ**

१ *आगरकर वाङ्मय,* संपादक, म. गं. नातू व दि. य. देशपांडे, खंड ३, पृ. ६७ (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९८६.)